संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत, मानव्य विज्ञान शाखेतील राज्यशास्त्र विषयातील आचार्य (पीएच.डी.) पदवी प्राप्तीसाठी प्रविष्ठ होऊ घातलेल्या प्रबंधाचा आराखडा (SYNOPSIS)

☐ संशोधन विषय

# "शिवसेना राजकीय पक्षाच्या विकासामध्ये महिला कार्यकर्त्यांच्या सहभागाचे विश्लेषणात्मक अध्ययन"

## (विशेष संदर्भ : वाशिम जिल्हा सन २००० ते २०१५)

☐ संशोधक

जया श्रीराम राठोड

☐ मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. सुभाष गवई

श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय,

कारंजा (लाड) ता. कारंजा (लाड) जि. वाशिम

☐ संशोधन केंद्र

राज्यशास्त्र संशोधन केंद्र

श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय,

कारंजा (लाड) ता. कारंजा (लाड) जि. वाशिम

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

२०२०--२१

Scanned by CamScanner

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत, मानव्य विज्ञान शाखेतील राज्यशास्त्र विषयातील आचार्य (पीएच.डी.) पदवी प्राप्तीसाठी प्रविष्ठ होऊ घातलेल्या

☐ प्रबंधाचा आराखडा ☐

१. संस्थेचे नाव व पत्ता : राज्यशास्त्र संशोधन केंद्र, श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा(लाड) ता. कारंजा(लाड) जि.वाशिम.

२. मार्गदर्शकाचे नांव : प्राचार्य डॉ. सुभाष गवई

३. संशोधन विषयाचे शिर्षक : ''शिवसेना राजकीय पक्षाच्या विकासामध्ये महिला कार्यकर्त्यांच्या सहभागाचे विश्लेषणात्मक अध्ययन'' (विशेष संदर्भ : वाशिम जिल्हा सन २००० ते २०१५)

४. संशोधनाचे उद्देश, व्याप्ती व मर्यादा :

अ. उद्देश :—

१. वाशिम जिल्हयातील शिवसेना पक्षाच्या राजकीय वाटचालीचे अध्ययन करणे.

२. वाशिम जिल्हयातील शिवसेना पक्षाच्या भुमिकेचा अभ्यास करणे.

३. वाशिम जिल्हयाच्या शिवसेना पक्षातील महिला कार्यकर्त्यांच्या राजकीय सहभागाचे अध्ययन करणे.

४. वाशिम जिल्हयाच्या शिवसेना पक्षाच्या विकासात महिला कार्यकर्त्यांच्या योगदानाचे अध्ययन करणे.

ब. व्याप्ती व मर्यादा:—

संशोधकाला आपले संशोधन करत असतांना आपल्या संशोधनाची व्याप्ती ठरवावी लागते. उदा. कालखंड, माहिती मिळविण्याचे मार्ग, निवडलेल्या नमुन्याची व्याती ही व्याप्ती एका व्यक्तीपासून गाव, जिल्हा, राज्य, देश, जगापर्यंत असू शकते. व्याप्ती निश्चित केल्यास संशोधकाचे क्षेत्र निश्चित होते. प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती ही वाशिम जिल्हया पुरताच मर्यादीत आहे.



Scanned by CamScanner

''शिवसेना राजकीय पक्षाच्या विकासामध्ये महिला कार्यकर्त्यांच्या सहभागाचे विश्लेषणात्मक अध्ययन'' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी वाशिम जिल्हयाची निवड करण्यात आली आहे. वाशिम जिल्हयातील महिलांचा राजकीय सहभाग, शिवसेना पक्ष वाढविण्यासाठी महिलांच्या योगदानाचा आढावा, शिवसेना पक्षातील महिलामधील राजकीय जाणिव, जागृती व राजकीय समस्यांचा अभ्यासा पुरताच मर्यादीत आहे. तसेच वाशिम जिल्हयातील शिवसेना पक्षातील महिलांचा सहभागाचा अभ्यास हा २००० ते २०१५ या कालखंडापुरताच मर्यादीत आहे.

**५. संशोधन प्रणाली व तथ्य संकलन :**

प्रस्तुत संशोधन हे प्राप्त तथ्याच्या आधारे सखोल अध्ययनावर आधारीत आहे. संशोधनाची पध्दत विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाणार आहे. ''शिवसेना राजकीय पक्षाच्या विकासामध्ये महिला कार्यकर्त्यांच्या सहभागाचे विश्लेषणात्मक अध्ययन'' या विषयाची माहिती मिळविण्यासाठी प्राथमिक व व्दितीय स्त्रोतांचा उपयोग केला जाणार आहे.

**अ. प्राथमिक स्त्रोत :**

प्राथमिक स्त्रोतांमध्ये प्रश्नावली, मुलाखती व निरिक्षण या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. प्रस्तूत संशोधनात महाराष्ट्र राज्यातील वाशिम जिल्हयातील शिवसेना पक्षातील महिला कार्यकर्त्यांची निवड करण्यात येणार आहे. वाशिम जिल्हयातील शिवसेना पक्षातील महिला कार्यकर्त्यांची निवड नमुना निवड पध्दतीतील लॉटरी पध्दतीचा वापर करून करण्यात येणार आहे. सर्वेक्षण पध्दती, प्रश्नावली व मुलाखती व त्यासंबंधीत दस्ताऐवजाचा वापर प्रथम स्त्रोत म्हणून वापर करण्यात येईल.

**ब. द्वितीय स्त्रोत :**

द्वितीय स्त्रोतांमध्ये प्रकाशित व अप्रकाशित अशा सर्व लिखित सामग्रीचा समावेश होतो. दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करतांना संशोधकास संशोधनासाठी लागणारी दुय्यम साधन सामुग्री, प्रबंध, शासकीय व निमशासकिय अहवाल, शोधनिबंध, साप्ताहीक, ग्रंथ, वाशिम जिल्हयातील शिवसेना कार्यालयातील माहिती, महिलांच्या राजकारणा संबंधीत विविध ग्रंथ, वर्तमानपत्रे, या माध्यमाद्वारे विषयाशी सबंधीत अनेक महत्त्वपुर्ण तथ्य व माहिती मिळविली जाणार आहे.



Scanned by CamScanner

६. संशोधनाचा कालावधी : २ ते ३ वर्षे

७. अंदाजे खर्च : रू. ९०,०००/—

८. संशोधकाचे नांव : जया श्रीराम राठोड

दिनांक : 15/09/2020
स्थान : कोटगा (लाड)

संशोधकाची स्वाक्षरी

दिनांक : 15.9.2020
स्थान : [illegible]

15.9.2020
मार्गदर्शकाची स्वाक्षरी
Dr. Subhash Gawai
Ph.D. Supervisor
R.No.SGB AU/Ph.D/314/2010
Sant Gadge Baba Amravati University
Amravati



Scanned by CamScanner

- **प्रस्तावना :**

जगातील सर्वात मोठी लोकशाहीचा देश म्हणून भारताची ओळख आहे. लोकशाहीमध्ये सर्व पक्षांना समान अधिकार दिलेले असतात. लोकशाही मध्ये लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधीचा समावेश असतो. निवडणूक म्हटले की राजकीय पक्ष आलेच. राजकीय पक्षामध्ये अनेक प्रकारचे पक्ष असतात. त्यापैकी आपण फक्त राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षाचाच विचार केला तर आजच्या आधुनिक लोकशाहित राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्षांना अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. कारण प्रातिनिधीक लोकशाहीत राजकीय पक्षांना महत्वपुर्ण भुमिका पार पाडावी लागते. लोकशाही शासन पध्दतीत जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधी मार्फत राज्यकारभार चालतो. भारतात बहुपक्ष पध्दती आहे. भारत स्वातंत्र्य प्राप्ती पासून पुढे ४० वर्ष कालखंडाचा विचार केला तर काँग्रेस पक्ष एक प्रभावी सत्ताधारी पक्ष म्हणून कार्यरत होता व विरोधी पक्ष कमकुवत समजल्या गेले. पण काही वर्षांनंतर यात बदल होत जाऊन विविध घटक राज्यात प्रादेशिक पक्षांचा उदय होवून त्यांचा प्रभाव वाढला. असाच एक राजकीय पक्ष म्हणजे 'शिवसेना' पक्ष होय.

'शिवसेना' महाराष्ट्रात मराठी लोकांसाठी व कट्टर हिन्दुवादी पक्ष म्हणून उदयास आला. 'शिवसेना' हया पक्षाची स्थापना भारतातील महाराष्ट्र राज्यातील मुंबई शहरामध्ये १९ जून १९६६ रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी केली. शिवसेना हा पक्ष मुलत: एका चळवळी पासुन उदयास आला. मुंबईत शहरात परप्रांतीयांचा प्रभाव वाढत चाललेला होता. परप्रांतीयांचा प्रभाव कमी करण्यासाठी व मराठी माणसांच्या हक्कावरील आक्रमण परतावून लावण्यासाठीची संघटना आहे, असे ५ जून १९६६ च्या मार्मिक अंकात शिवसेनेची प्रसिध्दी करण्यात आली. पुढे बाळासाहेबांचे वडील प्रबोधनकार ठाकरे यांनी या संघटनेला 'शिवसेना' हे नाव सुचविले आणि १९ जून १९६६ रोजी 'शिवसेना पक्ष' म्हणून उदयास आला.

'शिवसेना' या पक्षाचे प्रतिक चिन्ह 'वाघ' व निवडणूक चिन्ह 'धनुष्यबाण' आहे. तर या पक्षाचे घोष वाक्य 'जय भवानी जय शिवाजी' असे आहे. शिवसेना पक्षाला वाढविण्यामध्ये व गती देण्याचे खरे काम 'मार्मिक' साप्ताहीक व 'सामना' या वृत्तपत्राने केले आहे. बाळासाहेबांनी या दोन्ही मधून 'मराठी बाणा' लोकांमध्ये रूजविण्याचा प्रयत्न केला.



Scanned by CamScanner

शिवसेनेचे गेले चार दशकाचे फलीत म्हणजे शिवसेना ही लोकांच्या मनात बसली आणि शिवसेना शाखांचे महत्व वाढत गेले. बाळासाहेब ठाकरे यांनी ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण असणारा पक्ष म्हणजे 'शिवसेना' असे म्हटले. बाळासाहेबांनी अतिशय लहानातल्या लहान व्यक्तींना महत्वाचे स्थान देवून मराठी माणसांच्या मनात स्थान निर्माण केले. शिवसेनेच्या 'टपोरी' संस्कृतीमुळे एक वेगळाच धाक स्थानिक पातळीवर निर्माण झाला. पुढारीवर्ग व अधिकारीवर्गाने याची दखल घेतली. सुरूवातीच्या दोन दशकात शिवसेना फक्त मुंबई व ठाणे शहरापुरतीच मर्यादीत होती. पण १९६६ नंतर शिवसेनेची व्याप्ती वाढत गेली. १९८५ मध्ये मुंबई महापालिकेवर या पक्षाची सत्ता होती. संघटनेतील ज्येष्ठ नेत्यांनी मुंबई बाहेर आपल्या पक्षाने काम करावे हे ठरविले. बाळासाहेबांनी 'गांव तेथे शाखा, घर तेथे शिवसैनिक' अशी घोषणाच दिली. शिवसेना पक्ष संपुर्ण महाराष्ट्रात पसरला. अशीच एक शिवसेनेची शाखा वाशिम जिल्हयात स्थापन झाली.

वाशिम जिल्हयाचे प्राचीन नांव 'वत्सगुल्म' असे होते. 'वत्स' ऋषीने आपल्या आश्रमा जवळ देवांच्या गुल्मांची म्हणजेच समुहांची वस्ती घडवली होती. म्हणून या नगराला 'वत्सगुल्म' हे नांव पडले. वाशिमचे प्राचीन नांव वत्सगुल्म/वात्सुलग्राम आहे. यास बच्छोम, बासम असेही म्हणतात. इ.स. पूर्व सुमारे ३०० पासून येथे सातवाहन या राजवंशाची सत्ता होती. प्राचीन विदर्भात प्रशासकीय सोयीसाठी दोन ठिकाणी राजधान्य करण्यात आल्या. एक म्हणजे वाशिम व दुसरे नागपुर जिल्हयाच्या रामटेक तालूक्यातील 'नंदिवर्धन' (सध्याचे नगरधन) होय. वऱ्हाडातल्या वत्सगुल ऊर्फ बासम वाकाटक राज्याची राजधानी म्हणून पण ओळखल्या जाते. वाकाटकांचे साहित्यातील योगदान महत्त्वाचे आहे. त्यांच्या काळात 'वत्सगुल्म' च्या पसिरात अनेक तीर्थक्षेत्रे होती. आज ही वाशिमचे बालाजी मंदिर प्रसिध्द आहे. तेथे पद्मतीर्थ नावाचे तीर्थस्थान ही आहे. त्यानंतर चालुक्यांचे राज्य आले. त्यांनी आपली राजधानी दुसऱ्या ठिकाणी नेली. त्यामुळे या शहराचे महत्व कमी झाले त्यानंतर आलेल्या यादवांच्या राजवटीत पुन्हा या स्थानाचे महत्व वाढु लागले.

वाशिम येथे निजामाची टकसाळ होती. त्यानंतर इंग्रजांच्या राज्यात वऱ्हाड हा मुलुख आल्यावर त्यांनी वाशिमला जिल्हयाचे ठिकाणी केले. परंतु महराष्ट्रातील जिल्हयांच्या १९०५ मध्ये झालेल्या पुर्नरचनेत हा भाग नजिकच्या अकोला जिल्हयाला जोडण्यात आला. अकोला जिल्हयातील वत्सगुल्म व कारंजा येथे साडया व ब्लँकेट



Scanned by CamScanner

तयार केले जात. २६ जानेवारी १९९८ मध्ये अकोला जिल्हयातून वाशिम हा जिल्हा म्हणून घोषीत करण्यात आला. (काळे मा. या., 'वऱ्हाडचा इतिहास', चित्रा पब्लिकेशन, १९२४, पृ. क्र. ७,८.)

भारताच्या महाराष्ट्र राज्यातील वाशिम एक जिल्हा आहे. वाशिम जिल्हा १ जुलै १९९८ रोजी अकोला जिल्हयातून विभाजीत केल्या गेले. तेंव्हा अकोला जिल्हयातील शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख हे वाशिम जिल्हयाचे जिल्हाप्रमुख होते. वाशिम जिल्हा जेंव्हा स्वतंत्र जिल्हा म्हणून नावारूपास आला. १९९६–९७ मध्ये अकोल्याचे शिवसेनेचे लोकसभा खासदार पुंडलीकराव गवळी हे निवडून आले होते. वाशिम लोकसभा मतदार संघातून एक होता; असे १९९९ पासून सांगता येईल. पुन्हा १९९९ मध्ये पुंडलीकराव गवळी हेच खासदार म्हणून निवडून आले. वाशिम जिल्हा १ जुलै १९९८ मध्ये निर्माण होऊन येथे शिवसेना पक्षाची स्वतंत्र शाखा पुंडलीकराव गवळी व गुलाबराव गावंडेनी सोबत मिळुन स्थापन केली.

महाराष्ट्राच्या वर्तुळात शिवसेना पक्षाच्या घडामोडीत शिवसेनेतील महिला ब्रिगेडचा वाटा मोठया प्रमाणात आहे. वाशिम जिल्हयामध्ये शिवसेना शाखा प्रमुखपदी व तालुक्याच्या शाखेत पण महिलांचा सहभाग दिसुन येतो. वाशिम जिल्हयाच्या पहिल्या जिल्हाप्रमुख व महिला कार्यकर्त्या भावना गवळी या १९९९ मध्ये होत्या. तेंव्हाच मंगलाताई सरनाईक हया शहरप्रमुख होत्या. आता मंगलाताई सरनाईक हया वाशिम जिल्हयाच्या महिला जिल्हाप्रमुख आहेत व सुशिलाताई मडके हया शहरप्रमुख आहे.

शिवसेना पक्षाच्या प्रत्येक शाखेत एक पुरूष व एक महिला असे दोघेजन गटप्रमुख असतात. गटप्रमुखावर त्या मतदार संघातल्या हजार मतदारांची जबाबदारी असते, असे एका मतदार संघात १५–२० गटप्रमुख असतात. शिवसेनेत महिला कार्यकर्त्या मोठया संख्येने आहेत. पक्षाचा पाया उभारण्यात महिलांचे मोठे योगदान आहे. महिला हया पक्षाच्या पायाभूत घटक आहेत. त्यामुळे येथे महिला पुरूष एकमेकांना पुरक आहेत. शिवसेना पक्षात महिलांचा सहभाग १९९० च्या नंतरचा दिसून येतो. शिवसेना पक्षातील महिला कार्यकर्त्यांच्या सहभागाची दखल घ्यावी, समाजात नारी शक्तीची महती उलगडण्यासाठी सदर विषय पीएच.डी. संशोधनाच्या अध्ययनासाठी घेण्यात आला. त्यामुळे या शोधप्रबंधातून शिवसेनेच्या 'नारी शक्तीचा' वा महिलांच्या राजकीय प्रवासावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



Scanned by CamScanner

- **संशोधन विषयाचे महत्त्व :**

महिलांचा राजकारणातील सहभागाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने हा विषय महत्वाचा वाटतो. कारण आत्तापर्यंत वाशिम जिल्हयातील शिवसेना पक्षामध्ये महिलांचा राजकीय प्रवास या दृष्टीने अभ्यास झालेला नाही. प्रस्तूत संशोधनाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. महिलांच्या राजकीय प्रवासामुळे शिवसेना पक्षात व महिलांच्या जीवनात सामाजिक दृष्टया काय परिणाम झाला? त्यांच्या राहणीमानात सुधारणा झाली का? पक्ष वाढविण्यासाठी व राजकारणात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रभावी ठरली आहे का? राजकीय प्रवेशामुळे राजकारणातील महिलांच्या कुटूंबांवर काय परिणाम झाला इत्यादी प्रश्नांची उकल करण्याच्या दृष्टीने संशोधन विषयाचे महत्त्व वाढते.

- **संशोधनाची गृहितके :**

१. वाशिम जिल्हयात शिवसेना पक्षाच्या विकासात महिला कार्यकर्त्यांचा सहभाग अल्प राहत असल्याचे दिसून येते.

२. शिवसेना पक्षाच्या विकासात महिला कार्यकर्त्यांचे योगदान महत्तम असल्याचे दिसून येते.

३. वाशिम जिल्हयातील शिवसेना पक्षाच्या बांधणीत महिला कार्यकर्त्यांचा सहभाग सक्रिय राहत असल्याचे दिसते.

४. वाशिम जिल्हयात शिवसेनेच्या नेतृत्वात महिलांचा सहभाग हा महत्वाचा राहीला आहे.

५. वाशिम जिल्हयात शिवसेनेच्या विकासात महिलाना संधी नाकारण्यात आल्याचे दिसून येते.

वरिल अध्ययन करतांना सामान्यत: प्रतिपादनाची रूपरेषा खालील प्रमाणे —



Scanned by CamScanner

"शिवसेना राजकीय पक्षाच्या विकासामध्ये महिला कार्यकर्त्यांच्या सहभागाचे विश्लेषणात्मक अध्ययन"

(विशेष संदर्भ : वाशिम जिल्हा सन २००० ते २०१५)

- प्रकरणांची रचना :

**प्रकरण पहिले : वाशिम जिल्हयाची निर्मितीची पार्श्वभूमी**

प्रस्तुत प्रकरणात वाशिम जिल्हयाची निर्मिती व इतिहास.

**प्रकरण दुसरे : वाशिम जिल्हयाची सामाजिक, राजकीय व भौगोलीक पार्श्वभूमी.**

प्रस्तुत प्रकरणात वाशिम जिल्हयाची सामाजिक, भौगोलिक राजकीय पार्श्वभूमी अध्ययन केले जाणार आहे.

**प्रकरण तिसरे : शिवसेना पक्षाचा इतिहास व वाटचालीचा आढावा.**

प्रस्तुत प्रकरणात शिवसेना पक्षाची स्थापना, शिवसेना पक्षाचे ध्येय धोरण, शिवसेना पक्षाचे वैशिष्टये, इतिहास इत्यादी बाबींचे अध्ययन केले जाणार आहे.

**प्रकरण चौथे : वाशिम जिल्हयात शिवसेना पक्षाची स्थापना व नेतृत्व.**

प्रस्तुत प्रकरणात वाशिम जिल्हयाच्या निर्मितीनंतर शिवसेना पक्षाची स्थापना व शिवसेना पक्षातील आता पर्यंतच्या नेतृत्वाची व महिला कार्यकर्त्यांच्या कार्याचे अध्ययन केले जाणार आहे.

**प्रकरण पाचवे : वाशिम जिल्हयामधील शिवसेना महिला नेतृत्वाच्या विश्लेषणाचे अध्ययन.**

प्रस्तुत प्रकरणात वाशिम जिल्हयात शिवसेना पक्षाने स्थानिक, राज्यापासून ती राष्ट्रीयपातळी पर्यंत खंबीर नेतृत्व दिले आहे. त्यामध्ये १. उपजिल्हाध्यक्षा सौ. अनिताताई गावंडे (२००३) २. जिल्हा परिषद सदस्य सौ. शकुंतलाबाई विठ्ठल कव्हर (२००३) ३. खासदार भावनाताई गवळी (२००० पासून आज पर्यंत.) यांनी वाशिम जिल्हयात शिवसेना वाढीसाठी केलेल्या प्रयत्नांचे अध्ययन करण्यात येईल.



Scanned by CamScanner

प्रकरण सहावे : वाशिम जिल्हयात शिवसेना पक्षात सहभागी महिला कार्यकर्त्यांची भूमिका.

प्रस्तुत प्रकरणात वाशिम जिल्हयात शिवसेना पक्षात सहभागी महिला कार्यकर्त्यांच्या भूमिकेचे अध्ययन केले जाणार आहे.

- निष्कर्ष व शिफारशी.

सोबत अत्यल्प संदर्भ ग्रंथाची यादी जोडली आहे. त्या आधारावर या संशोधनास प्रारंभ करावा या उद्देशाने संशोधनाची रूपरेषा मान्यतेसाठी सादर करित आहे.

15.9.2020

मार्गदर्शकाची स्वाक्षरी

प्राचार्य डॉ. सुभाष गवई

संशोधकाची स्वाक्षरी

जया श्रीराम राठोड

दिनांक : 15.9.2020

स्थान : कारंजा (लाड)

दिनांक : 15/09/2020

स्थान : कारंजा (लाड)



Scanned by CamScanner

## English Reference Books


01. Anandan Sujata, 'SAMRAT: How the Shiv Sena Changed Mumbai Forever Provides an incisive look into life and times of Bal Thackeray', Harpercollins Publisher India, Nov. 2014.

02. Atreyee Sen, 'Shiv Sena Women Violence and Communalism in a Bombay Slum', Indiana University Press, 2007.

03. Banerjee Sikata, 'Warriors in Politics: Hindu Nationalism, Violence and The Shiv Sena In India', Westview Press, December 1999.

04. Eckert Julia, 'The Charisma of Direct Action: Power Politics and the Shiv Sena' Oxford University Press, 2003

05. Gupta Dipankar. 'Nativism in a Metropolis: The Shiv Sena in Bombay'. Manohar Publication, 1982, Bombay.

06. Katzenstein Mary Fainsod, 'Ethnicity and Equality: Shiv Sena Party and Preferential Policies in Bombay', Cornell University Press, September 1979.

07. Nag Kingshuk, 'The Saffron Tide', Rupa Publications India, June 2014.

08. Purandare Vaibhav, 'Bal Thackeray and the rise of Shiv Sena', Roli Book, February 2013.

09. Shetye Neeraj, 'Analyzing Political Rhetoric in India Case Study of Shivsena in Maharashtra', September 2017 - 21 April 2018.

10. Tarini Bedi, 'Feminist Theory and the Right Wing Shiv Sena Women Mobilize Mumbai?' Journal of International Women's Studies , 1539-8706, May 2006.

11. Tarini Bedi, 'The Dashing Ladies of Shiv Sena: Political Matronage in Urbanizing India' , Aleph Book Company, New Delhi, 2016

12. Thomas Blom Hansen, 'Wages of Violence – Naming and Identity in Postcolonial Bombay', Princeton University Press, November 2001




Scanned by CamScanner

13. अकोलकर प्रकाश, 'जय महाराष्ट्र हा शिवसेना नावाचा इतिहास आहे' मनोविकास प्रकाशन, प्रकाशन सन २०१३.

14. काळे मा. या., 'वऱ्हाडचा इतिहास', चित्रा पब्लिकेशन, १९२४.

15. कुलकर्णी अंजली, 'अपरिजीता—आ. डॉ. नीलम गोऱ्हे', विश्वकर्मा प्रकाशन सन २०१९.

16. खेकाळे नारायण, 'राजकिय नेतृत्व', मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९९.

17. पळशीकर सुहास व कुलकर्णी सुहास, ' महाराष्ट्रातला संघर्ष' समकालीन प्रकाशन, पाचवी आवृत्ती, २००७.

18. 'मराठी विश्वकोश', महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ मुंबई.

19. महाराष्ट्र सरकार, 'गॅजेटिअरस ऑफ द बॉम्बे प्रसीडेंसी.'

20. राऊत संजय, 'एकवचनी', मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१७.

21. सामंत विजय व हर्ष प्रधान, 'सुवर्ण महोत्सवी शिवसेना ५० वर्षांची घोडदौड', रिया प्रकाशन, २०१९.

22. संवदी ए. बी, 'महाराष्ट्राचा भुगोल', निराली प्रकाशन, पुणे, सन २०११.

23. सिंहल एस. सी., 'राजनितिक समाजशास्त्र', लक्ष्मी नारायण अग्रवाल प्रकाशन आग्रा, २००८.

24. वृत्तपत्रे: टाईम्स ऑफ इंडिया, तरूण भारत, द हितवाद, द हिंदू, देशोन्नती, पुढारी, महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, लोकसत्ता, सामना.

25. मार्मिक साप्ताहीक.

26. लोकराज्य मासिक.

27. शिवसेना वाशिम शाखांचे दस्ताऐवज.

28. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषदांची राजपत्रके.

Scanned by CamScanner

29. www.ceo.maharashtra.gov.in
30. www.eci.gov.in
31. www.loksatta.com
32. www.shivsena.in
33. www.elections.in
34. www.indiavotes.com
35. www.researchgate.net
36. www.zpwashim.in



Scanned by CamScanner